# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्रः- १२ पेपर कात्रण दिनांक :- १७/०३/२०२४

-----------------०००००० ------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेरा:-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

३) मा. पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक १७/०३/२०२४ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर


| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (**Heading**) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १७.०३.२०२४ | सामना पा. नं. ०५ | मिंध्यांच्या बेकायदेशिर कंटेनर कार्यालयांची अखेर उचलबांगडी | मिरा-भाईंदर | |
| २. | १७.०३.२०२४ | लोकसत्ता पा. नं .०१ | उत्तन-विरार दरत्यान ५५ किमीचा सागरी सेतू | इतर | |
| ३. | १७.०३.२०२४ | सामना पा. नं .०२ | चिल्लर चाळे थांबवा अन्यथा मराठयांच्या नाराजीचा आगडोंब उसळेल | इतर | |
| ४. | १७.०३.२०२४ | पुढारी पा. नं .०६ | रिक्षाच्या धडकेत आंतरराष्ट्रीय धावपटू जखमी | पेल्हार | |
| ५. | १७.०३.२०२४ | पुढारी पा. नं .०६ | विरारमध्ये सुतारकाम कारागिराची हत्या | विरार | |
| ६. | १७.०३.२०२४ | लोकमत पु. पा .०३ | भेटायला बोलवून केला विनयभंग | भाईंदर | |
| ७. | १७.०३.२०२४ | सकाळ पु. पा .०३ | किरकोळ भांडणातून पत्नीवर चाकूहल्ला | नयानगर | |
| ८. | १७.०३.२०२४ | लोकमत पु. पा .०३ | लाखो घेऊन ना कार दिली, ना रक्कम | मिरारोड | |
| ९. | १७.०३.२०२४ | लोकमत पु. पा .०३ | सुनेचे दागिने चोरल्याची फिर्याद | नवघर | |
| १०. | १७.०३.२०२४ | लोकमत पु. पा .०३ | गांजा ओढणा-या तरुणाला पकडले | मिरारोड | |
| ११. | १७.०३.२०२४ | लोकमत पु. पा .०३ | घरात घुसून केली चोरी | भाईंदर | |
| १२. | १७.०३.२०२४ | लोकमत पु. पा .०३ | महिलेची आत्महत्या | मिरारोड | |

सामना पा. नं. ५.

# मिंध्यांच्या बेकायदेशीर कंटेनर कार्यालयांची अखेर उचलबांगडी

## मीरा-भाईंदर पालिकेची कारवाई

**भाईंदर, दि. १६ ( सा.वा. ) - लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होताच मीरा-भाईंदर महापालिकेचे प्रशासन खडबडून जागे झाले आहे. मिंधे गटाने शहरात विविध ठिकाणी सुरू केलेल्या बेकायदा कंटेनर कार्यालयांची अखेर महापालिकेने उचलबांगडी केली आहे. क्रेनच्या सहाय्याने ही कार्यालये हटवण्यात आली. यावेळी कोणतीही हुल्लडबाजी होऊ नये याकरिता पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पालिकेच्या या दणक्याने मिंध्यांच्या बगलबच्च्यांना सणसणीत चपराक बसली आहे.**



मीरा-भाईंदर शहरात रस्त्यावर मनमानीपणे १५ ठिकाणी मिंधे गटाने कंटेनर थाटून आपली कार्यालये सुरू केली होती. त्यामुळे रहदारीला त्रास तर झालाच, पण उच्च न्यायालयाच्या आदेशाचेदेखील उल्लंघन करण्यात आले. शहरातील गोडदेव, गोल्डन नेस्ट, नवघर आणि रामदेव पार्क अशा भागात फुटपाथवर कंटेनर बसवून त्याला कार्यालयाचे स्वरूप दिले होते. काही दिवसांपूर्वी मिंधे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते त्याचे उद्घाटनदेखील करण्यात आले. मीरा-भाईंदरमध्ये अशा प्रकारची कंटेनर कार्यालये बेकायदेशीरपणे सुरू केल्याचे वृत्त दैनिक 'सामना'ने प्रसिद्ध केले होते.

मिंध्यांनी थाटलेले बेकायदेशीर कंटेनर कार्यालये त्वरित हटवा, अन्यथा आम्हीही आमची कार्यालये सुरू करू, असा इशारा विरोधकांनी दिला होता. शिवसेनेसह कॉंग्रेस, मनसेनेदेखील या कार्यालयांना विरोध केला. त्यानंतर प्रशासन जागे झाले आणि महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तांनी नोटिसा बजावल्या. तरीही मिंध्यांनी ही कार्यालये हटवली नाहीत. आज अखेर आचारसंहितेचा दणका बसताच महापालिकेने गोल्डन नेस्ट, इंद्रलोक, केबीन रोड, नवघर येथील कंटेनर कार्यालये हटवली. हे सर्व कंटेनर मीरा-भाईंदर पालिकेच्या आवारात ठेवण्यात आले आहेत.

### कारवाई सुरूच राहणार

मिंध्यांनी शहरात थाटलेली बेकायदा कंटेनर कार्यालये हटवण्यास आजपासून सुरुवात झाली. ही कारवाई उद्यादेखील सुरूच राहणार असून हे उशिरा सुचलेले शहाणपण असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. या कार्यालयांमध्ये वीजदेखील चोरून घेण्यात आली होती. मात्र अदानी कंपनीच्या दक्षता पथकाने त्यांचे कनेक्शनच कापून टाकले.

लोकसत्ता पा.नं.१.

# उत्तन- विरार दरम्यान ५५ किमीचा सागरी सेतू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** वर्सोवा- विरार सागरी सेतू रद्द करून आता केवळ उत्तन (भाईंदर)- विरारदरम्यान सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ५५ किमीच्या (जोडरस्त्यासह) या सागरी सेतूसाठी नव्याने व्यवहार्यता अभ्यास करणार आहे. या प्रकल्पाचा आराखडाही पुन्हा तयार करण्यात येणार आहे. यासंबंधीचा शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला.

मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी 'एमएमआरडीए'ने ९४ किमीचा वर्सोवा- विरार सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पासाठी ६३ हजार रुपये खर्च अपेक्षित होता. पण आता मात्र ९४ किमीचा सागरी सेतू ५५ किमी झाला आहे. वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्प रद्द करून आता केवळ उत्तन-विरार सागरी सेतू बांधण्यात येणार आहे. उत्तन येथेच म्हाळगी प्रबोधिनी ही एक स्वायत्त प्रशिक्षण आणि संशोधन संस्था कार्यरत आहे.

> **मुंबई महापालिका वर्सोवा- दहिसर- भाईंदर सागरी किनारा मार्ग बांधणार आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी दोन प्रकल्प होत असल्याने वर्सोवा- विरार सागरी सेतू रद्द करण्यात आला आहे.**



### व्यवहार्यता अभ्यास

महापालिकेच्या सागरी किनारा रस्त्याला जोडून सागरी सेतू पुढे कसा न्यायचा याचा अभ्यास केला जाणार आहे. सागरी सेतूची लांबी कमी झाल्याने साहजिकच खर्चही कमी झाला आहे. खर्चात किमान २५ हजार कोटी रुपयांची कपात होणार असून हा निधी आता विरार - पालघर सागरी सेतूसाठी वापरण्यात येणार आहे.

### दोन टप्प्यांत काम

मुंबई महापालिकेचा सागरी किनारा (कोस्टल रोड) रस्ता संपेल तेथून जोडरस्त्याद्वारे उत्तन- विरार सागरी सेतूला सुरुवात होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने यास मान्यता दिली आहे. उत्तन- विरार सागरी सेतूचे काम पहिल्या टप्प्यात केले जाणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात उत्तन- विरार सागरी सेतूचा विरार- पालघर असा विस्तार केला जाणार आहे.

सामना पा.नं.२०

# चिल्लर चाळे थांबवा अन्यथा मराठ्यांच्या नाराजीचा आगडोंब उसळेल!

**मनोज जरांगे यांचा फडणवीस यांना इशारा**

वडीगोद्री, दि. १६ (सा.वा.) – मराठा समाजाच्या तरुणांवर विनाकारण खोटे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. माझेही व्हिडीओ व्हायरल करण्यात येत आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे चिल्लर चाळे थांबवावेत, अन्यथा मराठ्यांच्या नाराजीचा आगडोंब उसळेल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

आंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे यांनी राज्य सरकारच्या आरक्षणविरोधी धोरणावर कडाडून हल्लाबोल केला. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठा समाजाशी द्वेषभावनेने वागत आहेत. मराठा तरुणांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

हे चिल्लर चाळे फडणविसांनी तात्काळ थांबवावेत, नसता त्यांना मराठ्यांच्या नाराजीला सामोरे जावे लागेल, असा इशारा जरांगे यांनी दिला. मराठा आरक्षणाचा प्रश्न ज्वलंत असताना आचारसंहिता लावणे हा अन्याय आहे, असेही ते म्हणाले. मराठा आरक्षणाची मागणी थंड्या बस्त्यात ठेवण्यात आली आहे आणि याचा फटका फडणवीस यांना बसल्याशिवाय राहणार नाही, असे जरांगे यांनी स्पष्ट केले.

मला बदनाम करण्याचे कारस्थान रचण्यात आले आहे, पण मला हात लावाल तर तुमच्या ६२ आमदारांच्या भ्रष्टाचाराची कुंडली माझ्याकडे आहे, असा इशारा देतानाच राजकारण हा माझा मार्ग नाही, असेही मनोज जरांगे यांनी सांगितले. निवडणुकीत मतदान कुणाला करायचे हे मराठा समाजाने ठरवावे, असेही ते म्हणाले.



### एसआयटीचा अहवाल मला माहिती आहे

मराठा आरक्षण आंदोलनाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एसआयटीचा अहवाल काय आहे हे मला माहिती आहे. मला अडकवण्यासाठी हा अहवाल अगोदरच तयार करण्यात आला असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला. अहवाल तयार आहे तर मग चौकशीला काय कॅनडातून पोलीस बोलावणार आहात का, असा टोलाही त्यांनी लगावला.

---

पुढारी पा.नं.६.

# रिक्षाच्या धडकेत आंतरराष्ट्रीय धावपटू जखमी

- **मिनाज नदाफ हिच्यावर उपचार सुरू**
- **पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय धावपटू मिनाज नदाफ यांचा मोबाईल हिसकावून पळ काढणाऱ्या चोरट्याला पकडत असताना एका रिक्षाची धडक लागली असून मोबाईल घेवून चोरटा पसार झाला. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी रात्री चोरासोबत झालेल्या झटापटीत



धावपटू जखमी झाल्या आहेत. शुक्रवारी रात्री त्यांच्या रिक्षामध्ये बसलेल्या एका प्रवाशाने त्यांना मारहाण करून हातातील मोबाईल हिसकावून नेला. त्याला पकडण्याच्या प्रयत्नात एका रिक्षाने नदाफ यांना धडक दिली. यात त्या जखमी झाल्या.

नालासोपारा सेंट्रल पार्क येथे राहणाऱ्या मिनाज नदाफ या महिला रिक्षा चालक आहेत. त्याचबरोबर त्या धावपटू म्हणून ओळखल्या जातात. राष्ट्रीय स्तरावर त्यांनी विविध राज्यात तीनशेहून अधिक मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेतला असून जवळपास १८० पदके जिंकली आहेत. नुकत्याच त्या श्रीलंका येथील स्पर्धेत भाग घेऊन परतल्या होत्या. गुरुवारी रात्री त्या नेहमीप्रमाणे रिक्षा चालवत होत्या. यावेळी नदाफ यांनी चोराशी झटापट केली. मात्र त्याने नदाफ यांना मारहाण करून पळ काढला. त्यांना पकडण्यासाठी नदाफ त्याच्या मागे धावत असताना अपघात झाला.

पुढारी पा.नं.६.

# विरारमध्ये सुतारकाम कारागिराची हत्या

## कोपरी खदानीजवळ आढळला मृतदेह

**नालासोपारा: पुढारी वृत्तसेवा** विरार पूर्वेच्या नारंगी कोपरी कच्ची खदान रोडवर एका ४० वर्षीय इसमाची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

दीपक उमेश चव्हाण असे हत्या झालेल्या इसमाचे नाव असून तो मुंबईच्या मालाड परिसरात सुतार काम करत होता.

शुक्रवारी सकाळी त्याचा मृतदेह दगडाने ठेचलेल्या अवस्थेत खदान परिसरात स्थानिकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती विरार पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता अज्ञात आरोपींनी मयत इसमाच्या डोक्यावर व चेहऱ्यावर दगडाने प्रहार केल्याचे निदर्शनास आले.

याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांची तीन विविध पथके आरोपीच्या शोधासाठी रवाना केली असल्याची माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी दिली आहे. पुढील तपास सुरू आहे.

लोकमत पु.पा.३.



# भेटायला बोलावून केला विनयभंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** सामाजिक कार्य करणाऱ्या ३७ वर्षीय महिलेचा विनयभंग करून तिला शिवीगाळ करत धमकावणाऱ्या गणेश फडके (रा. बेकरी गल्ली, भाईंदर पश्चिम) याच्यावर नयानगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पीडित महिलेला मीरा रोडच्या शांतीनगर भागातील मीरामणी हॉटेल येथे भेटायला बोलावून त्याने तिचा विनयभंग केला.

महिलेने गणेश फडकेच्या संस्थेत भरलेले २ हजार परत मागितले असता फडकेने शिवीगाळ करत तुला पैसे मिळणार नाहीत. कुठल्या चौकीत जायचे जा. तुला बघून घेईन, अशी धमकी दिली.

सकाळ पु.पा.२.

# किरकोळ भांडणातून पत्नीवर चाकूहल्ला

भाईंदर, ता. १६ (बातमीदार) : पत्नीसोबत झालेल्या किरकोळ भांडणातून पतीने तिच्यावर चाकूहल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना मिरारोडच्या नयानगर भागात घडली आहे. यात पती व पत्नी दोघेही जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे.

मूळचे नेपाळचे असलेले आणि सध्या मुंबईतील वडाळा येथील राहणारे नीलेश सिंग व मीना सिंग हे पती-पत्नी शुक्रवारी दुपारी मीरारोड येथील नयानगर परिसरात राहणाऱ्या आणि रखवालदार म्हणून काम करणाऱ्या मुकेश सिंग या पुतण्याला भेटण्यासाठी आले होते. कामानिमित्त मुकेश बाहेर गेला असता, पती व पत्नी यांच्यात काही कारणावरून भांडण झाले. भांडणात पतीने घरातील चाकूने पत्नीवर अनेक वार केले. त्यात ती गंभीर जखमी झाली. त्यानंतर त्याने स्वतःलाही जखमी केले. घटनेची माहिती मिळताच नयानगर पोलिस घटनास्थळी पोहचले आणि दोघांनाही रुग्णालयात दाखल केले. गुन्ह्यात वापरलेला चाकू पोलिसांनी जप्त केला असून पुढील तपास करत आहेत.

लोकमत पु.पा.३.

# लाखो घेऊन ना कार दिली, ना रक्कम

मीरा रोड : गाडी खरेदीच्या नावाने पावणेअकरा लाख रुपये घेऊन फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी मीरा रोड पोलिसांनी १५ मार्चला तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

काशीमीरा येथील अग्रवाल ग्रीन व्हिलेज बंगल्यातील शकील कोतवाल यांचा गाड्या खरेदी-विक्री व्यवसाय आहे. त्यांना राहुल सुनार (रा. दिल्ली), सोनिया (रा. ठाणे) आणि इमरान मेहमूद खान (वय ४३, रा. जोगेश्वरी पश्चिम) या तिघांनी कोतवाल यांना राखाडी रंगाची इनोवा क्रिस्टा कार विक्रीसाठी दाखवली. कार कोतवाल यांना पसंत पडल्याने त्रिकुटाने कोतवाल यांच्याकडून पावणेअकरा लाख रुपये घेतले, परंतु नंतर मात्र कोतवाल यांना गाडी दिली नाहीच, शिवाय घेतलेले पैसेही परत केले नाहीत. पोलिस उपनिरीक्षक किरण वंजारी अधिक तपास करत आहेत.

# सुनेने दागिने चोरल्याची फिर्याद

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : सुनेने घराचे व कपाटाचे टाळे तोडून घरातील रोख व दागिने चोरल्याच्या सासऱ्याच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी सुनेवर गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पूर्वेच्या आरएनपी पार्कच्या रुची अपार्टमेंटमधील प्रेमचंद गुप्ता यांनी १३ मार्चला नवघर पोलिस ठाण्यात सून शैलजा अमितकुमार गुप्ता (वय २८, रा. नवघर मार्ग) हिच्यावर चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक धनावडे तपास करत आहेत. तर या आधी शैलजा यांच्या फिर्यादीवरून सासरे प्रेमचंद, पती अमितकुमार आदींवरही नवघर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

# गांजा ओढणाऱ्या तरुणाला पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : शांती पार्क भागातील रॉयल ऑर्केड इमारतीमधील हिमांशू तुलसी राज (वय २१) हा इमारतीच्या जवळ सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढत असताना १५ मार्च रोजी सायंकाळी पोलिसांना आढळून आला. हवालदार संजय बेडवाल यांच्या फिर्यादीवरून मीरा रोड पोलिस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनिरीक्षक तानाजी सावंत तपास करत आहेत.

# घरात घुसून केली चोरी

मीरा रोड : खोलीच्या उघड्या जाळीवाटे घरात प्रवेश करून चोरट्याने दागिने व रोख असा ३२ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. भाईंदर पश्चिमेच्या आंबेडकर नगर झोपडपट्टीमधील रमेशकुमार मालविया हे १५ मार्चला सकाळी जवळच राहणाऱ्या त्यांच्या बहिणीच्या खोलीत कपडे ठेवण्यासाठी गेले होते. त्यावेळी खोलीतील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. खोलीच्या उघड्या जाळीवाटे अनोळखी चोरट्याने घरात प्रवेश करून आतील दागिने व रोख असा ३२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस हवालदार एस. सी. भालेराव तपास करत आहेत.

# महिलेची आत्महत्या

मीरा रोड : मीरा रोडच्या पार्क व्ह्यू हॉटेलजवळ सेवन इलेव्हन रेसिडेन्सीमधील पाणीपुरी विक्रेते विनोदकुमार गुप्ता यांची पत्नी किरण (वय ३८) हिने घरातील हॉलच्या छताच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून मीरा रोड पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.